स.के.नं. ७०८/१५

नि.क्र. १६/क

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे</u>**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – फिरोज सय्यद आगा

वय – ५० वर्षे

व्यवसाय – नोकरी, पो.ह., खारघर पोलीस ठाणे

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. कदम यांच्यामार्फत...</u>**

१. दिनांक ०१.१०.२०१५ रोजी मी जासई येथे रात्रपाळी गस्तीवर हजर होतो. त्यादिवशी रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास नियंत्रण कक्षातून द्रोणागिरी येथील स्टर्लिंग वजन काट्याजवळ अपघात झाल्याची माहिती मिळाली. त्यावरून मी व पो.ना. खरात घटनास्थळाजवळ गेलो. तेथे एक ट्रेलर व मोटारसायकलचा अपघात झाला होता. मोटारसायकलस्वाराच्या डोक्यावरून व छातीवरून ट्रेलर गेला होता. त्यामुळे तो जखमी होउन मयत झाला होता. तेथे मोटारसायकलवर पाठीमागे बसलेला इसम अमित तिवारी हजर होता. त्याला काही झालेले नव्हते.

२. अपघातातील दोन्ही वाहने तेथेच होती. मला अपघातातील वाहनांचे नोंदणी क्रमांक सांगता येणार नाही. त्यानंतर मी पोलीस ठाण्यास घटनेची माहिती दिली. त्यानंतर आम्ही जखमीस इंदिरा गांधी रूग्णालय, उरण येथे नेले. डॉक्टरांनी त्यास मयत घोषित केले.

३.        त्यानंतर मी दोन पंचांसमक्ष मरणोत्तर पंचनामा केला.  आता मला पंचनामा दाखवण्यात आला.  त्यावर माझ्या व पंचांच्या सह्या आहेत.  मजकूर खरा व बरोबर आहे.  पंचनामा **नि.क्र. १७** वर आहे.  मी घटनास्थळावर गेलो त्यावेळी ट्रेलरचा चालक पळून गेलेला होता.  मी त्याला पाहिलेले नाही.

सरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण,

(विकास डी. बडे)

दिनांक – ०५.०१.२०२४

न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण